# शोषण मुलांचे : इकडचे आणि तिकडचे

## चंद्रशेखर पुरंदरे

**पार्श्वभूमी**

पश्चिमेत आज मुलांवरील लैंगिक अत्याचार हा अत्यंत निर्घृण गुन्ह्यांपैकी एक गुन्हा मानला जातो. या प्रश्नाकडे तीन प्रकारे पहाणे आवश्यक वाटते. सामाजिक विकृतींचे परीक्षण, पाश्चात्य समाजात मुरलेली सार्वत्रिक भीती आणि शोषण. सामाजिक विकृतींचे परखड विश्लेषण करण्याची व त्यावर धोरणात्मक उपाययोजना करण्याची पश्चिमेची - विशेषत: युरोपची - स्तुत्य परंपरा असते. उदाहरणार्थ, गेल्या शतकात समाजातील स्त्रियांचे दुय्यम स्थान यावर तात्त्विक व व्यावहारिक पातळ्यांवर बराच उहापोह झाला. त्याची परिणती शासकीय धोरण बदलण्यात झाली; स्त्री समानतेचे कायदे अस्तित्वात आले. (आपल्याकडे ही बऱ्याच वेळकाढूपणानंतर का होईना, निर्वाचन प्रक्रियेत महिलांना आरक्षण मिळाले.) दुसरे उदाहरण समलिंगी संबंध ठेवू इच्छिणाऱ्यांचे. त्यावरही परंपरावादी व पुरोगामी यांच्यात बरेच विचारमंथन दीर्घकाळ झाले. स्त्री समानतेइतकी व्यापक मान्यता या संबंधांना अजून मिळालेली नसली, तरी त्या दिशेने वाटचाल चालू दिसते. अनेक देशात आता कायदा समलिंगी विवाह ग्राह्य मानतो, अशा दांपत्यांच्या दत्तक मुलांना इतर मुलांसारखेच अधिकारही मिळतात.

या दोन सामाजिक प्रवाहांप्रमाणे मुलांवरील अत्याचारांवर आळा घालण्याचे प्रयत्न होत आहेत. लेखात पुढे म्हटल्याप्रमाणे हे उपाय मूल्यसापेक्ष आहेत व प्रसंगी ते समाजजीवन अधिकच गढूळ करताना दिसतात. पण निदान आजवर हेतुपुरस्सर दुर्लक्ष करण्यात येणारे सामाजिक प्रश्न उघड्यावर आणून त्यांची चिरफाड होतानाही दिसते.

दुसऱ्या प्रकारे या प्रश्नाकडे पहाताना पश्चिमेतील समाजमानसावरील सततच्या संदिग्ध भीतीची पकड लक्षात घ्यायला हवी. या अत्याचारांची प्रतिक्रिया हा या सार्वत्रिक दडपणाचा भाग झाला आहे. याचा जरा विस्ताराने उल्लेख लेखात पुढे आहे.

या प्रश्नाचा तिसरा पैलू म्हणजे सत्ताधीश - सत्ताहीन या नात्यातील शोषण. हे शोषण आर्थिक, सामाजिक, राजकीय किंवा लैंगिक असू शकते. उदा. आपल्याकडील जातीय अत्याचार. दलित स्त्रियांची नग्न धिंड काढणे, त्यांच्यावर सामूहिक बलात्कार, प्रसंगी खून इथपर्यंत हे शोषण होत असते. मुले हा समाजातील दुबळा घटक असतो. प्रौढांकडून होणाऱ्या या घटकाच्या शोषणाचा लैंगिक शोषण हा एक प्रकार आहे.

**कॅथॉलिक चर्च व अत्याचार**

मुलांवरील एकूण समाजातील अत्याचारांची चर्चा पश्चिमेत गेली बरीच वर्षे होत आहे. पण ती एखाद्या पुरुषाने (किंवा क्वचित प्रसंगी स्त्रीने) केलेल्या विशिष्ट प्रसंगाशी मर्यादित असे. ९० च्या दशकापासून कॅथॉलिक चर्चमध्ये अशा घटना दीर्घकाळ चालू आहेत हे उघडकीस येऊ लागले. हे शोषण वैयक्तिक पातळीवर नसून संस्थात्मक पातळीवर होते. कॅथॉलिक चर्चमधील धर्मोपदेशकांना विवाहाची परवानगी नाही. त्यांनी आजन्म ब्रह्मचारी राहणे अपेक्षित आहे. हे अत्याचार या मंडळींनी बहुतेक वेळा मुलग्यांवर केले. चर्चने किंवा स्थानिक शाळेने चर्चच्याबरोबर आयोजित केलेल्या कार्यक्रमात मुलांचा सहभाग असतो. त्यादरम्यान हे प्रकार घडले.



भूतकाळातील या घटनांविषयी अत्याचारांचे बळी आता सार्वजनिकरीत्या बोलू लागले आहेत. ते आज चाळिशीच्या पुढे आहेत. या तीस-पस्तीस वर्षांत समाजजीवनातील चर्चेचे महत्त्व वाढले आहे, एकूण सामाजिक वातावरणही जास्त मोकळे होत आहे आणि धर्मनिरपेक्ष शासन व त्याची न्यायव्यवस्था काही प्रमाणात तरी कार्यक्षम आहे. त्यामुळे या प्रश्नाला वाचा फुटली आहे.

एका अंदाजानुसार अमेरिका (देशातील) सहा राज्यांतच १९५० ते २००२ या काळात दहा हजारांहून अधिक मुलग्यांवर हे अत्याचार झाले. दुसऱ्या एका अभ्यासानुसार किमान साडेचार हजार धर्मोपदेशकांनी हे उद्योग केल्याचा लेखी पुरावा आहे. लेखी पुरावा मिळवणे हे सोपे काम नाही. बलात्कार झालेली स्त्री सामाजिक शरमेमुळे, अपराधीपणाच्या भावनेमुळे अशा घटनेची वाच्यता करायलाही अनुत्सुक असते, मग लेखी नोंद, तक्रार करणे दूरच. तसेच हेही पुरुष ही जखम अनेक वर्षे चुपचाप सहन करत होते. म्हणजे खऱ्या ग्रस्त लोकांचा आकडा वरील आकड्यांच्या काही पट तरी असावा.

हे प्रकरण बाहेर यायला सुरूवात झाली ती युरोपमधील बहुतेक देशात व अमेरिकेत. पण जगभर जेथे जेथे कॅथॉलिक चर्च पोहोचले आहे त्या सर्वच भागातून अगदी दर आठवड्याला हे प्रकार उघडकीस येत आहेत. ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, आफ्रिका (टांझानिया व केनिया), आशिया (फिलिपिन्स) इत्यादी. बहुतेक ठिकाणी धर्मोपर्देशकाचा पदसिद्ध अधिकार व प्रभाव यामुळे हे अत्याचार घडू शकले. त्याबरोबरच आफ्रिकेत तेथील दारिद्र्याचा फायदा घेऊन अन्न, छोट्या भेटवस्तू यांचीही लालूच दाखवण्यात आली.

**संस्थात्मक प्रतिसाद**

संस्था म्हणून चर्च या प्रकरणाला दोन प्रकारे सामोरे गेले. कॅथॉलिक चर्चचे सर्वोच्च सत्तास्थान म्हणजे रोमजवळचे व्हेटिकन. तो स्वायत्त देशच आहे. संपूर्ण जगातील कॅथॉलिक चर्चचे धोरण व्हेटिकन ठरवते. अत्याचार उघडकीला येऊ लागल्यावर व्हेटिकन सावध झाले. हे प्रकार घडतच नाही अशी भूमिका व्हेटिकनने घेतली. एकदा ही भूमिका घेतल्यावर ती बदलणेही उत्तरोत्तर अवघड होत गेले. हे आरोप बिनबुडाचे आहेत; चर्चच्या, ख्रिश्चन धर्माच्या विरोधकांनी, साम्यवाद्यांनी हे आरोप केले आहेत असा व्हेटिकनचा पवित्रा राहिला.

स्थानिक पातळीवर म्हणजे प्रत्यक्ष जिथे हे प्रकार घडत होते, तेथे जनक्षोभ हाताबाहेर जात आहे हे लक्षात आल्यावर प्रथम भर प्रकरण दाबवून टाकण्यावर राहिला, मग अत्याचारी धर्मोपदेशकाची दुसरीकडे बदली करून त्याला स्थानिकांपासून 'अदृश्य' करण्यात आले. विशेष म्हणजे ज्या नवीन ठिकाणी अशा धर्मोपदेशाला पाठवण्यात येत असे, तेथे त्यांचा गुन्हेगारी भूतकाळ सांगण्यात येत नसे. म्हणजे, शिक्षेऐवजी त्याला नवीन कुरणच उपलब्ध होई. जेव्हा, या पळवाटेनेही प्रकरण दबत नाही असे लक्षात आले, तेव्हा मुलग्यांच्या पालकांवरच 'यांनीच मुलांकडे दुर्लक्ष केले' असा ठपका ठेवण्यात आला. 'तिनेच तोकडे कपडे घालून बलात्काराला आमंत्रण दिले' अशा थाटाचे हे विधान होते. जेव्हा अशा प्रतिवादानेही प्रकरण मिटेना तेव्हा कोर्टाबाहेरच काही नुकसानभरपाई देऊन ते मिटवण्याचा प्रयत्न झाला. गुन्हा वस्तुत: त्या देशाच्या कायद्यानुसार निधर्मी असला, तरी प्रकरण निधर्मी कोर्टात पोचू नये याची शक्य तेवढी खबरदारी घेण्यात आली. अगदी अपवादात्मक प्रकरणात स्थानिक चर्चच्या इतर पदाधिकाऱ्यांनी आपल्या गुन्हेगार सहकाऱ्यावर काही कारवाई केली. पण त्यांनीही प्रकरण 'वर' पाठवल्यास ते दाबले जाईल याची खात्री असल्याने त्याचा निवाडा त्यांच्याच पातळीवर केला. हे प्रकार धर्मनिरपेक्ष राज्यशकट हाकणाऱ्या देशात झाले. त्यामुळे 'सामान्य' गुन्हेगाराला ज्यातून जावे लागते ती प्रक्रियाच धर्मोपदेशकांच्या नशिबी आली नाही. ही प्रक्रिया म्हणजे पोलीस चौकशी, खटला, दंड, तुरूंगवास, सरकार दरबारी गुन्हेगार म्हणून नोंद, वगैरे. आजवर अमेरिकन चर्चने अडीच बिलियन डॉलर्स नुकसानभरपाईपोटी दिले आहेत. ज्या केसेस कोर्टात आल्या, त्यात अडीचशे ते तीनशे धर्मोपदेशक गजाआड झाले आहेत.

**बळींवरचे परिणाम**

बालपणातील या अनुभवांचे दूरगामी अनिष्ट परिणाम आढळून आले आहेत. मुळात प्रौढांवरच्या विश्वासाला कायमचा तडा जातो. ज्या प्रौढावर आपण विश्वास टाकला तोच जर शारीरिक अत्याचार करत असेल तर उर्वरित आयुष्यासाठी प्रौढ विश्वासार्ह रहात नाहीत. बालक-प्रौढ नात्याविषयी संभ्रमाने ही सुरूवात होते, मग स्वत:च्या लैंगिकतेविषयी संभ्रम, त्यात विकृती येणे, आपण बळी झालो, आता इतरांना बळी करू या आक्रमक लैंगिकतेचा उदय, नैराश्य; टोकाच्या परिणामात आत्महत्येकडे वाटचाल इथपर्यंत हे परिणाम होऊ शकतात.

**व्हेटिकनची भूमिका**

ही प्रवृत्ती चर्चमध्ये नाहीच अशी भूमिका व्हेटिकनने घेण्यामागे थोडा इतिहास आहे. जॉन पॉल दोन हा सध्याच्या पोपच्या आधीचा पोप होता. तो १९७८ ते २००५ पर्यंत म्हणजे २६ वर्षे पोप राहिला. हे सगळे पूर्वसंचित त्याच्या कारकीर्दीत बाहेर यायला सुरूवात झाली. जॉन पॉल दोन मूळचा पोलंडचा. तिथल्या चर्चमधील त्याची कारकीर्द तत्कालीन कम्युनिस्ट राजवटीविरुद्ध चर्च टिकवून ठेवण्यात गेली. कारण कम्युनिस्ट धर्मविरोधी. हा मोठाच संघर्ष होता. त्यादरम्यान चर्चला संस्था म्हणून बदनाम करण्यासाठी

कम्युनिस्ट राजवटीने चर्चवर भ्रष्टाचार, अनाचार, देशद्रोह असे अनेक आरोप सतत केले. (मग कम्युनिस्ट राजवट उलथली गेली व पोलंडमध्ये लोकशाही आली.) पण पोप झाल्यावरही जॉन पॉल दोनची मानसिकता पोलंडमधीलच राहिली. इंदिरा गांधींना जशी आपल्यावरील टीका हा देशद्रोह वाटत असे, तसाच मुलग्यांवरील लैंगिक अत्याचार हा चर्च विरोधकांचा कट आहे ही त्याची धारणा होती. सध्याचा पोप - बेनेडिक्ट सोळा - हा त्यावेळी जोसेफ राट्झिंगर या खऱ्या नावाने अशी प्रकरणे हाताळणाऱ्या व्हेटिकनच्या विभागाचा प्रमुख होता. या दोघांनीही - पोप जॉन पॉल दोन आणि राट्झिंगर - या तक्रारींकडे पद्धतशीर दुर्लक्ष केले. त्यामुळे चर्चचे हे धोरण मानून व्हेटिकनपासून प्रत्येक देशातील स्थानिक पातळीपर्यंत याबाबत उदासीनता पाळण्यात आली.

**सामाजिक भीती**

पश्चिमेतील प्रसारमाध्यमात अशा लैंगिक अत्याचारांच्या बातम्या जवळजवळ रोजच येतात. मग ते पूर्व आशियात (भारतासारख्या देशात) यासाठी होणारे पर्यटन असो, इंटरनेटवर चालणारी मुलांवरील अत्याचारांच्या प्रतिमांची देवघेव असो किंवा एखाद्या शाळेत किंवा पाळणाघरातील कर्मचाऱ्याने (स्त्रियांसकट) केलेले अत्याचार असोत. एक सांस्कृतिक विशेष म्हणजे, आपल्याकडचा अन्यायाबाबतचा निर्ढावलेपणा तेथे आढळत नाही. तर तो समाज अधिकच भयभीत होताना दिसतो. बाल अत्याचाराबाबत एकूणच वातावरण प्रौढ-बालक नात्याबद्दल कमालीचे गढूळ झाले आहे. कोणताही प्रौढ, विशेषत: पुरुष हा संभाव्य बाल-अत्याचारीच असणार, या नजरेने त्याच्याकडे पाहिले जाते. काही वर्षांपूर्वी स्त्रीवादी चळवळीत असाच विचार उदयाला आला होता. 'कोणताही पुरुष हा संभाव्य बलात्कारी असतो' याचे हे या संदर्भातले रूप आहे. त्यात चर्चच्या संस्थात्मक वर्तणूकीने भर पडली आहे. मुलांशी वागताना प्रौढ पुरुष अतिशय सावध झाले आहेत. माझ्या ओळखीचे इंग्लंडमधील एका शाळेचे मुख्याध्यापक मला म्हणाले, ''अगदी परवापरवापर्यंत मी एखाद्या मुलाचा प्रेमाने गालगुच्चा घेत असे. आता मी फार तर त्याच्या डोक्यावर हलकेच, कळेल न कळेल अशी टप्पल मारतो.'' शारीरिक जवळीक, स्पर्श प्रौढ-बालक नात्यातून बाद झाले आहेत. आज या देशात शाळेच्या मुलांच्या गॅदरिंगमधील त्यांच्या नाटक-नाच-गाणे अशा कोणत्याही कार्यक्रमाचे फोटो घेण्यास पालकांना बंदी असते. समजा, तुम्ही फोटो काढला, आपल्या मुलाचा त्याच्या मित्रांबरोबरचा फोटो म्हणून इंटरनेटवर टाकला तर कोठेतरी एखादा विकृत माणूस मुलांपर्यंत पोचण्याचा प्रयत्न करू शकेल किंवा प्रतिमांचा गैरवापर करू शकेल ही भीती या बंदीमागे आहे. प्रौढ-बालक यांच्यातील या संपुष्टात येणाऱ्या संबंधांचा अनिष्ट परिणाम मुलांच्या विकासावर होतो. त्यांच्यातील एकलेपणा वाढणे, त्यांना रोल-मॉडेल नसणे, प्रौढांच्यात व एकूण समाजात मिसळण्याचे कौशल्य अविकसित राहणे, असे दीर्घकालीन परिणाम होतात. ही संभाव्य, बहुधा काल्पनिक भीती हा पश्चिमेतील सार्वत्रिक भीतीचा भाग झाली आहे. त्यात मुस्लिम आतंकवाद, आर्थिक असुरक्षितता, लयाला गेलेली कुटुंबव्यवस्था, वैयक्तिक आरोग्याची काळजी असे इतर अनेक घटक आहेत. पण तो विषय निराळा.

**चर्चची विश्वासघातकी परंपरा**

या अत्याचारांकडे डोळेझाक हा कॅथॉलिक चर्चच्या सामाजिक प्रश्नांकडे दुर्लक्ष करण्याच्या परंपरेचा भाग दिसतो. खालील उदाहरणांवरून स्पष्ट होईल की चर्च दुबळ्या घटकांच्या निकडीच्या प्रश्नांबाबतही त्यांच्या बाजूने भूमिका घेत नाही.

'लिबरेशन थिऑलॉजी' नावाचा चर्चचाच अंतर्गत एक विचारप्रवाह दक्षिण अमेरिका खंडात काही वर्षांपूर्वी उदयाला आला. तेथे भारतासारखे दारिद्र्य व कमालीची विषमता आहे. अनेक देशात चर्च प्रबळ आहे. समाजातील दुबळ्या गटांचे संघटन ख्रिस्ताच्या शिकवणूकीनुसार करता येते असा वर्तमान सामाजिक संदर्भ त्यांनी ख्रिश्चन धर्माला दिला. ती चळवळच झाली आणि आपल्या हितसंबंधांना या चळवळीने धक्का लागेल हे प्रस्थापिताच्या लक्षात आले. प्रस्थापित व्यवस्था चालू ठेवणारे तीन प्रमुख घटक - सरकार, चर्च आणि माफिया. सरकारचे राजकीय हितसंबंध या चळवळीने धोक्यात आले असते. कारण आपल्याकडच्या सारखीच गरीबांची व्होट बँक नव्या जागृतीने आटण्याची शक्यता होती. प्रस्थापित चर्चचे श्रद्धेचे हितसंबंध शाबूत ठेवायचे असेल तर या विद्रोही थिऑलॉजीला लोकप्रियता लाभणे व्हेटिकनला परवडणारे नव्हते. दक्षिण अमेरिकेत अंमली पदार्थांचा व्यापार करणारा माफिया फार प्रबळ आहे. लिबरेशन थिऑलॉजीच्या अनुयायांमुळे त्यांचे आर्थिक संबंध टिकणे कठीण होते. त्यामुळे या तिघांनी मिळून लिबरेशन थिऑलॉजी खच्ची केली. राट्झिंगरने तर हा ख्रिश्चन साम्यवाद आहे, त्याला ख्रिश्चन धर्माची मान्यताही नाही आणि धर्मात त्याला स्थानही नाही हे स्पष्ट केले. या तीन शक्ती एकत्र विरोधात येण्याचा परिणाम म्हणजे थिऑलॉजीच्या काही धर्मोपदेशकांना चर्चमधून बहिष्कृत करण्यात आले, काहींचे खूनही करण्यात आले. म्हणजे, दुर्बलांच्या बाजूने उभे राहण्याऐवजी चर्चने दमनकारी धोरण अवलंबले.

गर्भपाताच्या बाबतही चर्चची भूमिका अशीच आहे. बलात्कारातून राहिलेला गर्भ, अगदी मतिमंद स्त्रियांना अशा प्रकारातून राहिलेला गर्भ, गर्भ वाढल्यास आईच्या जीवाला धोका पोचण्याची स्पष्ट शक्यता, गर्भाला कायमचे व बरे न होणारे विकार असणे वगैरे कोणत्याही कारणास्तव कर्मठ चर्च गर्भपाताला परवानगी देत नाही. युरोपमधील विशेषत: पोर्तुगाल व दक्षिण

अमेरिकेतील अनेक देशांत या धोरणामुळे स्त्रिया अनंत यातना सहन करत आलेल्या आहेत. अमेरिका देशात व इटलीमध्ये या मुद्यावर दोन परस्परविरोधी तट उभे राहिलेले आहेत.

लिबरेशन थिऑलॉजी, गर्भपात यांप्रमाणेच आणखी एक हेतुपुरस्सर दुर्लक्षाचा मुद्दा म्हणजे चर्चच्या अधिकारपदी स्त्रियांना पोचू दिले जात नाही.

कित्येक धर्मोपदेशकांना आजन्म ब्रह्मचर्य झेपत नाही. चर्चने या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष केले आहे. बाल-अत्याचाराचे काही प्रमाणात तरी हे एक कारण असावे.

समलिंगी संबंध ठेवू इच्छिणारे व तरीही चर्चचे अनुयायी राहू इच्छिणारे यांना प्रोत्साहन दिले जात नाही.

दुसऱ्या शब्दांत इतर कोणत्याही प्रस्थापित धर्मासारखाच कॅथॉलिक धर्मही पुरुषप्रधानच आहे. दुसऱ्या एका प्रस्थापित धर्माचा संस्थापक आजच्या व्याख्येनुसार व त्याच्या लैंगिक वर्तणूकीनुसार बाल-अत्याचारीच म्हटला जातो. या धर्ममार्तडांना सेक्सबाबत निश्चित भूमिका घेणे तत्त्वत:च शक्य नाही कारण स्त्रिया त्यांच्या दृष्टिपथातच नाहीत. मग समलिंगी संबंध ठेवू इच्छिणारे दूरच. निदान बाहेरच्या जगात यांना समान हक्क देण्याचे प्रयत्न तरी होत आहेत. पण याच जगाने आता कोठे मुलेही समाजाचे महत्त्वाचे सभासद आहेत अशी नोंद घ्यायला सुरूवात केली आहे, त्यामुळे चर्चकडून ती अपेक्षाच चूक आहे.

**बालहक्क व लैंगिक अत्याचार**

मुलांवरील अत्याचार, त्यातही लैंगिक अत्याचार हे त्यांच्या हक्कांचे उल्लंघन आहे. अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत हक्कांबरोबरच अभिव्यक्ती, विचार, निवड यांचे स्वातंत्र्य व स्वत:च्या शरीराचे लैंगिक अतिक्रमणापासून संरक्षण हेही हक्कच आहेत. बालहक्क प्रतिपादनाचा हा आग्रह आहे. काही पाश्चात्य पुस्तकी विद्वानांच्या मते व समलिंगी संबंधांचा पुरस्कार करणाऱ्यातील एका विचारप्रवाहाच्या मते मुलांच्या लैंगिक हक्काबाबत मुख्य प्रवाह गफलत करतो. (उदा. North American Man/Boy Love Association ही संघटना). त्यांच्या मते 'अज्ञान' किंवा 'अल्पवयीन' ( underage या अर्थी) ही संकल्पनाच मुख्य प्रवाहाने लादलेली आहे. लैंगिक क्रांती घडवायची असेल, तर लहान मुलांचा लैंगिक अधिकार मान्य करायला हवा. मुले pre-sex किंवा sexless असतात हे गृहीत पूर्वग्रहदूषित व चुकीचे आहे. लैंगिक शोध व संभोग हा मुलांचा हक्क आहे, मुलांना लैंगिक अनुभव देणे हा त्यांना समर्थ करण्याच्या प्रक्रियेचा अविभाज्य भाग आहे. बहुधा पालकांचे त्यांच्या (तरी) मुलांवरील प्रेम वादातीत असते. या प्रेमाची परिणती संभोगात झाल्यास आदर्श परिस्थिती होईल. म्हणजे पालकांनी स्वत:च्या मुलांशी (तरी) लैंगिक संबंध ठेवावेत. मुख्य प्रवाह अगदी अलिकडेपर्यंत समलिंग संबंध गर्ह्य मानत होता. आज ते अनेक ठिकाणी स्वीकारले गेले आहेत किंवा स्वीकारले जात आहेत. या लैंगिक क्रांतीचा पुढचा टप्पा प्रौढ-बालक लैंगिक संबंध मान्य करणे हा आहे. विख्यात स्त्रीवादी विदुषी केट मिलेट यांचे हे मत आहे. या विचारांचे पुरस्कर्ते त्यांच्या सोयीचे पुरावेही देतात. त्यानुसार प्रौढांबरोबरच्या लैंगिक संबंधातून मुलांना आनंदच मिळालेला दिसतो. उत्तरायुष्यातही अनिष्ट परिणाम झालेले दिसत नाहीत. जर असे परिणाम झालेच तर त्याचे कारण मुख्य प्रवाहाची सदोष मूल्यव्यवस्था असते, लैंगिक संबंध नाही. हे पुरस्कर्ते स्वत:ला नव्या युगाचे प्रेषित मानतात.



**सत्ता समीकरण**

काही प्रौढ (पुरुष व स्त्रिया) इतर प्रौढांशी समान पातळीवर भावनिक व्यवहार करू शकत नाहीत. त्यांची अपेक्षा सत्ता व नियंत्रण ही असते. मुलांवर अत्याचार करणारे बहुतेकजण मानसिकदृष्ट्या असुरक्षित असतात. मुलांशी लैंगिक संबंध त्यांना सत्ता व नियंत्रणाच्या समाधानातून सुरक्षिततेची भावना देतात. अर्थात काही अत्याचारी या संबंधांकडे मजा किंवा खेळ म्हणूनही पाहतात. परंतु दोन्ही प्रकारात सत्ता-समीकरण असुंतलितच राहते. चर्चच्या एका बिशपने समलिंगी संबंध व मुलांवरील लैंगिक अत्याचार यांच्या नात्याचा अभ्यास केला आहे. त्याच्या निष्कर्षानुसार या दोन्हींचा परस्परसंबंध नाही. म्हणजे परत उत्तर सत्तेची इच्छा येथेच जाते. बलात्काराच्या संदर्भात हीच सत्ता हेच प्रमुख कारण आढळले आहे.

**भारतीय संदर्भ**

संस्थात्मकदृष्ट्या चर्चसारखा 'अधिकृत' अत्याचार भारतात विस्तृत प्रमाणात दिसत नाही. याचा अर्थ असा अजिबात नाही की अत्याचार कमी असावेत. पण त्याची नोंद किंवा आकडेवारी उपलब्ध नाही. मिझोराम, केरळमधील चर्चचा या संदर्भात उल्लेख होतो, पण अशी संघटित गुन्हेगारी पर्यटन क्षेत्र आणि अनाथ मुलांना निवारा देणाऱ्या संस्थांत आढळते. गोव्यात काही वर्षांपूर्वी असा प्रकार उघडकीला आला होता. तेथे पाश्चात्य पर्यटकांसाठी स्थानिक मुले पुरवली जात असत. त्या प्रकरणात एक दोघांना अटक झाली. (सगळे पाश्चात्य, गोरे पुरुष) बाकीचे फरारी झाले किंवा मायदेशी पळून गेले.

विशाखापट्टणम् आणि मुंबईतील रस्त्यावर राहणाऱ्या मुलांना आश्रय देणाऱ्या संस्थातही हे उद्योग चालत असत. याही संस्था पाश्चात्य गोऱ्या पुरुषांनी चालवल्या होत्या. दुर्दैवाने पाश्चात्य हात असेल तरच माध्यमांना हे प्रकार उघडकीला आणण्यात रस असतो. शिवाय जोवर पर्यटनाकडे पैसा मिळवणारा उद्योग म्हणून पाहिले जाते व जोवर पाश्चात्य स्वयंसेवी संघटनांना देवदूत मानले जाते. तोपर्यंत या प्रकारांकडे 'छोटी' किंमत म्हणूनच पाहिले जाणार.

भारतात सुमारे ८० लाख मुले रस्त्यावर राहतात. त्यांच्यावर लैंगिक अत्याचार करणे किंवा त्यांना देहविक्रय करायला भाग पाडणे हे वैयक्तिक गुन्हेगारांना किंवा संघटित टोळ्यांना सहजशक्य असते. कारण या मुलांना वालीच नाही. शासन त्यांच्याकडे 'प्रॉब्लेम' म्हणून पाहते. सामाजिक दुर्लक्षाचा परिणाम म्हणून पहात नाही. या संख्येवरून या प्रश्नाचे परिणाम भारतात किती मोठे असावे याचा अंदाज येईल. घरात होणारे, शैक्षणिक संस्थांत होणारे, वसतीगृहात होणारे अत्याचार निराळेच.

हा लेख लिहित असताना सात ऑगस्टच्या रविवार इंडियन एक्प्रेसमध्ये एक संपूर्ण पान बातमी या विषयावर होती. केरळातील एका १४ वर्षांच्या मुलीवर तिच्या वडिलांनी बलात्कार केला. नंतर दोन वर्षे तिला वेश्याव्यवसायाला लावले. शेवटी कडेलोट झाल्यावर मुलीने आजीला हा प्रकार सांगितला. मग प्रकरणाला वाचा फुटली. आता ती मुलगी सरकारी निवाऱ्यात आणि वडील पोलीस चौकशीत आहेत. किमान १३० जणांवर बलात्कारी, बाल-अत्याचारी म्हणून गुन्हा नोंदवण्यात आला आहे. हे फक्त 'उघड' झालेले बलात्कारी. त्यात राजकारण्यांपासून सनदी अधिकाऱ्यांपर्यंत सगळ्यांचा समावेश आहे. वडिलांविषयी मुलगी संभ्रमित भावनेत आहे. एकीकडे, प्रेम, आदर, दुसरीकडे आपल्या इच्छेविरुद्ध आपल्या शरीराचा गैरवापर करणारा पुरुष असा हा संभ्रम आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या बालहक्क या कार्यक्रमावर भारताने सही केली आहे. या हक्कांची अंमलबजावणी येथे किती दूर आहे हे या उदाहरणावरून स्पष्ट व्हावे. ही समस्या गुणात्मक व संख्यात्मकदृष्ट्या किती गंभीर आहे याची जाणीव ना बृहद् समाजाला ना सरकारला, ना कुटुंबांना. एरवी वाचाळ असणाऱ्या विविध नागरीसंघटना, प्रसारमाध्यमे, विचारवंत, शैक्षणिक संस्था, स्वयंसेवी संघटनाही याबाबत अनभिज्ञ दिसतात. असे घडले हे सांगण्यास बळीला कुटुंबसंस्थेपासून समाजापर्यंत जे अनुकूल वातावरण लागते, त्याचाच भारतात अभाव आहे.

याविषयी मोठ्या प्रमाणात सामाजिक संवेदना वाढली तर हा प्रश्न अस्तित्वात आहे इतपत जागृती तरी होऊ शकेल. इलाजावर चर्चेची अजून वेळही आलेली नाही.

*चंद्रशेखर पुरंदरे*
*E-mail - artnondeco@yahoo.co.uk*
*Website - www.art-non-deco.com*

❐